संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर
संपादकीय
नवाकाळ
।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# सामान्यांचा असामान्य नेता जॉर्ज फर्नांडिस

**सामान्यांसारखे** राहुन सामान्यांचे प्रश्न असामान्य ताकदीने सोडवणारा एक सर्वमान्य नेता म्हणून जॉर्ज फर्नांडिस यांचे वर्णन करावे लागेल. वयाच्या ८८ व्या वर्षी त्यांनी आपली ईहलोकीची यात्रा संपवली. जवळपास गेली दहा वर्षे ते अंथरूणाला खिळून होते. दांडगा जनसंपर्क असलेला हा नेता केवळ शारीरिक व्याधींमुळे काही वर्षे अज्ञातवासात गेल्यासारखीच परिस्थिती होती. कर्नाटकात जन्म झालेल्या जॉर्ज फर्नांडिस यांचे कर्तृत्व मात्र महाराष्ट्र, बिहार, गुजरात, उत्तरप्रदेश आणि दिल्ली याचठिकाणी गाजले असे म्हणता येईल. समाजवादी विचारांचा वसा घेतलेल्या या कार्यकर्त्याने आपल्या विचारधारेशी कधीही फारकत घेतली नाही. खरे तर नेता झाल्यानंतरही ते साधारण कार्यकर्त्यासारखेच वावरत होते. रेल्वे मंत्री, संरक्षण मंत्री अशी विविध पदे भूषवतानाही त्यांनी आपला खादीचा झब्बा आणि पायजमा हा वेश कधी सोडला नाही. किंबहुना त्यांच्या विचारांमध्ये सातत्याने सामान्यांविषयी कळकळच व्यक्त होताना नेहमी दिसत असे. भ्रष्टाचाराविरुध्दचा लढा लढत असताना या देशातील गोरगरीब जनतेला कामगार शेतकरी वर्गाला न्याय मिळाला पाहिजे आणि या देशातील प्रत्येकाच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण झाले पाहिजे. ही कळकळ त्यांनी शेवटपर्यंत जपली. कामगार नेता लोकशाहीचा किंबहुना संविधानाचाही एक चांगला अभ्यासक संसदेतल्या नियमांची तितकीच चांगली जाणीव असलेला तर्कशुध्द विचार मांडून आपला प्रभाव पाडणारा उत्कृष्ट वक्ता म्हणूनही त्यांची प्रतिमा निर्माण झाली होती. आणीबाणीमध्ये त्यांनी केलेला संघर्ष हा एका मोठ्या इतिहासाची नोंद ठरते. बडोदा डायनामाईट खटला त्या काळात प्रचंड गाजला. सतत संघर्ष आणि क्रांतिकारक चळवळी करण्याचा जॉर्ज फर्नांडिस यांचा स्वभाव होता. आपल्या संपूर्ण सार्वजनिक जीवनामध्ये तत्वांशी तडजोड न करणाऱ्या आणि धर्म, संप्रदाय, जात या सगळ्यांना पूर्णपणे बाजूला ठेवणाऱ्या जॉर्ज फर्नांडिस यांची अनेक आगळीवेगळी गुणवैशिष्ट्ये सांगता येतात. इंग्रजी, हिंदी भाषेवरचे प्रभुत्व आणि तडजोड किंवा समझोत्याचे राजकारण न करणारी त्यांची प्रवृत्ती म्हणजे भारतीय राजकारणातले स्वच्छ आणि चारित्र्यशील नेतृत्व होते यात काही शंका नाही. प्रामुख्याने ऐंशीच्या दशकामध्ये प्रचंड लोकप्रियता आणि लोकमान्यता मिळालेला हा एक लोकनेता होता.

## मुंबईशी असलेले नाते

भारतीय राजकारणामध्ये केवळ विचारधारेचे बोट धरून समाजसेवा किंवा देशसेवा करणारे हाताच्या बोटावर मोजण्याइतके नेते आहेत त्यामध्ये जॉर्ज फर्नांडिस यांचा उल्लेख करता येतो. त्यांचे महाराष्ट्राशी एक वेगळेच नाते होते. रेल्वे कर्मचाऱ्यांसाठी त्यांनी अखिल भारतीय संघटना उभारली. त्यापाठोपाठ उद्योगनगरी असलेल्या या मुंबईत कामगारांसाठीदेखील अनेक मोठे लढे उभारल्याचे पाहायला मिळते. हिंद मजदूरपंचायत या संघटनेचे ते आधारस्तंभ होते. त्याहीपूर्वी म्हणजे १९६७ ला स. का. पाटीलांना पराभूत करून ते पहिल्यांदा लोकसभेत निवडून गेले. मुंबईबरोबरचा त्यांचा हा पहिला राजकीय संबंध नंतर मात्र अनेक आंदोलनांच्या निमित्ताने आणि समाजवादी चळवळीच्या निमित्ताने कायम राहिला होता. एस. एम. जोशी, नानासाहेब गोरे, मृणाल गोरे, मधु दंडवते यांच्या बरोबरीने त्यांनी महाराष्ट्रातल्या अनेक चळवळींमध्ये त्यांनी कृतीशील भाग घेतला. परिणामी ते मराठीतूनही चांगले भाषण करीत असत. आक्रमकता ही त्यांच्या भाषणाची शैली तर होतीच. परंतु कायदा आणि नियमांचा अभ्यास असल्यामुळे अन्यायाचा प्रतिकार करण्याची क्षमता ते आपल्या भाषणांमधून सहजपणे निर्माण करीत असत. मुंबईतल्या जवळपास सर्व कामगार लढ्यांमध्ये त्यांचा सहभाग राहिलेला आहे. अनेकवेळेला त्यांनी पुकारलेल्या बंदमुळे त्यांना बंदसम्राट म्हणूनच ओळखले जाऊ लागले.जॉर्ज हे त्यांचे नावही राजकीय नेत्यांच्या आणि सामाजिक चळवळीच्या कार्यकर्त्यांमध्ये इतके रुळले होते की, त्या नावातूनही त्यांच्याविषयीची एकनकळत आपुलकी निर्माण झाली होती. मुंबईशी किंवा महाराष्ट्राशी त्यांचा आलेला संबंध हा वैचारिक निष्ठेचा तितकाच मोठा निदर्शकही ठरतो. अन्यथा दिल्लीत गेलेला नेता किंवा मंत्रीपदे उपभोगलेली व्यक्ती स्वभावाने बरीच बदलून जाते. परंतु महाराष्ट्रातल्या किंवा मुंबईतल्या सामान्य कार्यकर्त्याशीदेखील या नेत्याने अगदी सहज संबंध ठेवले होते. कुठेही मोठेपणाचा आव ते आणत नसत. त्यांचा दिल्लीतला बंगला म्हणजे महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांसाठी एक हक्काचे घर होते.

## दरारा आणि आदर

फर्नांडिस हे समाजवादी विचारसरणीचे असूनदेखील त्यांचे अटलबिहारी वाजपेयी यांच्याशी सर्वाधिक चांगले संबंध होते. १९७५ च्या जयप्रकाश नारायण यांच्या संपूर्ण क्रांती आंदोलनातला त्यांचा सहभाग आणि नंतर जनता पार्टीच्या स्थापनेतली त्यांची भूमिका तितकीच महत्वपूर्ण ठरली.देशहिताचा विचार करताना वैचारिक मतभेद बाजूला ठेवता येतात. काँग्रेसपेक्षा देशात विरोधी पक्षांचे सरकार येणे आणि सामान्य जनतेला दिलासा देणे या गोष्टींना त्यांनी प्राधान्य दिले. त्यांची अभ्यासपूर्ण भाषणे आणि काँग्रेसचा भ्रष्टाचार खणून काढण्याची त्यांची आक्रमकता इतकी जबरदस्त होती की ते बोलायला उठल्यानंतर सगळ्यांचे कान टवकारले जात आणि आता जॉर्ज कोणता नवा हल्ला करतील याकडे सर्वांचे लक्ष लागलेले असे. निस्वार्थपणे काम करण्याची त्यांची पध्दत अटलबिहारी वाजपेयी यांना विशेष भावली आणि म्हणूनच आपल्या मंत्रिमंडळातील संरक्षण मंत्र्यांचे महत्वपूर्ण पद त्यांनी जॉर्ज यांच्याकडे सोपवले होते. दरारा, आदर आणि प्रेम कायम ठेवण्याचे सौभाग्य फार थोड्या नेत्यांच्या वाट्याला येते. ते जॉर्ज फर्नांडिस यांना लाभले होते. आपल्या संपूर्ण सार्वजनिक जीवनामध्ये स्वच्छ चारित्र्याचा आणि अतिशय साधेपणाने वावरणारा गेल्या चाळीस वर्षातला हा एकमेव नेता होता असे म्हटले तरी ते चुकीचे ठरणार नाही. आजच्या राजकारणाचे स्वरुप पाहिल्यानंतर जॉर्ज फर्नांडिस यांचे वेगळेपण सहजपणे नजरेत भरते.